The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue 3; March 2024

# संत साहित्यातील पर्यावरण

संशोधक : मारोती जगजेराव डोईफोडे सहशिक्षक जि.प.
हायस्कूल ताडकळस ता.पूर्णा जि.परभणी
मार्गदर्शक : प्रा.डॉ. निलेश एकनाथराव लोंढे
ज्ञानोपासक कॉलेज परभणी

**म**हाराष्ट्राला अनेक थोर संतांची परंपरा लाभली आहे. त्यांनी आपल्या वाणी आणि लेखणीने समाजमनाचे सिंचन केले. या समाजमनाचे सिंचन होण्यासाठी ,आध्यात्मिक व नैतिक अधिष्ठान देऊन मोक्ष प्राप्तीसाठी भक्ती मार्ग सांगितला.प्रपंचात राहूनही नित्य नामस्मरण करीत राहिले तर मोक्ष प्राप्ती होते, परमेश्वर प्राप्ती होते असा उपदेश केला. हा उपदेश करताना संतांनी आपल्या साहित्यातून आजूबाजूच्या परिसरातील पशु, पक्षी, नदी, पर्वत, डोंगर, मेघ, वृक्ष, हवा, पाणी, इत्यादी घटकांचा वापर सहज सुंदर दाखले,उपमा,रूपक व दृष्टांत यासाठी योजिला. या विविध घटकांच्या वैशिष्ट्यांचा आपल्या काव्यात सहज सुंदर गुंफण केली. संतांनी निसर्गाची विविध रूपे पाहिली व अनुभवली होती. तीर्थयात्रेच्या निमित्ताने विविध ठिकाणी पदभ्रमण केले होते. तसेच ऋषीमुनींचे, संतांचे आश्रम निसर्गाच्या कुशीत असत. त्यांनी विविध ठिकाणी वास्तव्य केले होते. त्यातूनच त्यांचे पर्यावरण संबंधीचे चिंतन झालेले दिसून येते. नद्या, डोंगर, वृक्ष, लता, अरण्ये, समुद्र, पशु, पक्षी, पृथ्वी, चंद्र, सूर्य, तारांगण, मानव आणि एकूणच चराचरसृष्टी विषयीचे त्यांना असणारे अलोट प्रेम, निसर्गाप्रती पूज्यभाव, सूक्ष्म अवलोकन व चिंतन पाहावयास मिळते.

संत ज्ञानेश्वरांनी गीतेवर 'भावार्थदीपिका' हा ओवीबुद्ध मराठी टीकाग्रंथ लिहिला.ज्ञानेश्वर कृत या ग्रंथालाच 'ज्ञानेश्वरी 'असे म्हणतात. आपल्या काव्य प्रतिभेने आणि निसर्गातील विविध घटकांचे दाखले देत भाषामाधुर्याने हा ग्रंथ निर्माण केला. गीतेमधील भावार्थ स्पष्ट करताना ज्ञानेश्वराने जीवसृष्टीच्या प्रेमामुळे आपल्या सूक्ष्म निरीक्षणाने निसर्गातील विविध घटकांचा साकल्याने विचार केला. त्यांनी 'जीवसृष्टी 'आणि 'भूतसृष्टी 'या संकल्पनेचा उपयोग पर्यावरण अर्थाने घेतला आहे.

**यापरी माझा भावी | हे जीवसृष्टी आहे आवघी |**
**गुंतली असे जाणावी | पंडूकुमरा ||**
**किंबहुना यापरी | निजप्रकृति अंगीकारी |**
**आणि भूतसृष्टी एकसरी |प्रसवोंची लागे||**

निसर्गातील वृक्ष ,मेघ,हवा, जल,प्रकाश हे घटक मानवाप्रति समभावाने ,न्यायतत्त्वाने वागतात. कसल्याही प्रकारचा भेदभाव करत नाहीत. सर्वाभूती समदृष्टी ठेवणारा व्यक्ती आणि वृक्ष एकसमान आहेत असे संत ज्ञानेश्वरांना वाटते,

**जो खांडावया घावो घाली | का लावणी जयाने केली |**
**दोघा एकची साउली | वृक्षु दे जैसा ||**

संत ज्ञानेश्वर माऊलींनी निसर्गाचे संतुलन बिघडू न देता नगरे रचावी, घरे बांधावी, जलाशय निर्माण करावी, विविध प्रकारचे वृक्ष लावावेत,उद्याने निर्माण करावीत असा पर्यावरण रक्षणाचा व संवर्धनाचा संदेश त्यांनी आपल्या पुढील ओव्यांमधून करून देतात.

**नगरे रचावी | जळाशये निर्मावी |**

**महावने लावावी | नानाविधे ||**

जिथे वसंत ऋतू आहे तेथे झाडांना पाने फुले फळे आलीच ,तसे साधकाने ज्ञानी माणसाकडे ज्ञान संपादन करण्यासाठी यावे.या दृष्टिकोनातून संत ज्ञानेश्वर वृक्षाला ज्ञानी पुरुषाच्या समान उभे करतात.

**वसंत तेथ वने | वन तेथ सुमने |**

**सुमनी पालिंगने | सारंगाची ||**

**गुरु तेथे ज्ञान | ज्ञानी आत्मदर्शन |**

**दर्शनी समाधान | आर्थी जैसे ||**

संत ज्ञानेश्वरांच्या निसर्ग वाचनाला दाद द्यावी अशा अनेक ओव्या ज्ञानेश्वरीत आढळतात. **पैल तो गे काऊ कोकताहे ||**. अशा ओव्यमधून शुभ शकुन सांगणारा कावळा , **पै पारिवा जैसा किरीटी ||** या ओवी मधून पारव्याचे सुरेख चित्रणआले आहे. तसेच चातक ,चकोर, मोर या पक्षांचा उल्लेख त्यांच्या अभंग ओव्यांमधून दिसून येतो. मेघांचा दृष्टांत ही ज्ञानेश्वराने अनेकदा दिला आहे
निष्काम कर्मयोगासाठी बांबूच्या फुलोऱ्याचा दृष्टांत, कासविनीचा दृष्टांत, हिंडनवारा, कर्पूरकेळी अशा निसर्ग संवेदन असणारे विविध शब्दकळा त्यांच्या ओव्यांमधून पदोपदी दिसून येतात.

**का आकाशी गंधर्व नगर | भूतळी पिपिलिका बांधे घर |**

**नाना मेरूवरी सपूर | परमाणु बैसले ||**

या ओवीत वारुळांची आकाशातील गंधर्व नगरीशी तुलना केली आहे आणि मेरू पर्वतावर लहान लहान परमाणु बसावेत तसे वारुळाच्या आतील मुंग्याचे घर दिसते असे सांगितले. ज्ञानेश्वरांच्या अशा अलौकिक उपमा पाहून आपण थक्क होतो. ज्ञानेश्वरीतअशी अनेक निसर्गाची वैशिष्ट्ये ,गुपिते ,चमत्कार पाहायला मिळतात. संत ज्ञानेश्वरांचे समकालीन संत नामदेवाने ही आपल्या अभंगात संतांना वृक्षाची उपमा दिली आहे.

**जैसा वृक्ष नेणे मान अपमान|**

**तैसे ते सज्जन वर्तताती||**

संत नामदेवांनी संत सज्जन व्यक्ती मान अपमान यांच्या पलीकडे जाऊन आचरण करतात. वृक्ष ज्याप्रमाणे पशु पक्षी या सर्वांना निवारा देतात त्याप्रमाणे संत व्यक्ती आपल्या सानिध्यात येणाऱ्या सर्व लोकांचे कल्याण करतात. अशा संत सज्जनासाठी त्यांनी वृक्षाची उपमा योजने ते अतिशय समर्पक आहे. "मुंगी व्याली शिंगी झाली "या अभंगातील रूपकाच्याआधारे संत नामदेवानीं निसर्गातील प्राणी मात्रा विषयीचे सूक्ष्म चिंतन दिसून येते.

**वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे**

**पक्षी ही सुस्वरे | आळवीती ||**
**येणे सुखे रुचे एकांताचा वास |**
**नाही गुण दोष | अंगा येत ||**
**आकाश मंडप प्रथिवी आसन**
**रमे तेथे मन | क्रीडा करी ||**

संत तुकारामांचा हा अभंग तर पर्यावरणाविषयी जागर मांडणारा आहे. वृक्ष ,पशु ,पक्षी हे सगेसोयरे आहेत. त्यांच्यासोबतचा एकांत वास तुकारामांना प्रिय आहे . आकाश मंडप आणि पृथ्वी आसन आहे तेथेच मन रमते. त्यांच्या सहवासात कुठलाही गुणदोष अंगाला येत नाही. यातून संतांचा पर्यावरणाविषयीचा निकोप दृष्टिकोन दिसून येतो.निसर्ग संवेदनाचा जागर व पर्यावरणीय जाणीवचे बीज संत साहित्यातुन ठायी ठायी दिसून येतात.

**सिंचन करिता मूळ |**
**वृक्ष ओलावे सकळ || किंवा**
**ओले मूळ भेदी खडकाचे अंग |**
**अभ्यासाशी सांग कार्य सिद्धी ||**

संत तुकाराम प्रयत्नांने, अभ्यासाने अशक्य ते शक्य होते हे सांगताना निसर्गातील घटनांचे दाखले देतात. संत साहित्यात विश्वनिर्मितीचे कारण पंच महाभूतांना मानले जाते. पंचमहाभूते म्हणजे पृथ्वी, पाणी, अग्नी, वायू, आकाश ही होत. म्हणूनच सूर्याला सूर्यदेवता, पृथ्वीला माता,वाऱ्याला वायू देवता,पाण्याला वरूण देवता, तर आकाशाला विश्व ब्रम्हांड मानले जाते. हेच परमेश्वराचे व्यक्त रूप आहे अशी श्रद्धा दिसून येते.

**पंचभुते झाले जग पंचभुतांचीलगबग |**
**पंचभुते गेली या मग काय आहे ||**

हे जग पंच महाभूतांमुळेच निर्माण झाले आहे. ती नसती तर राहिलेच काय ? असे संत रामदासांना वाटते. समर्थ रामदासांचे शिवथर घळीचे वर्णन असलेले स्फुट काव्य तर प्रसिद्ध आहे. सृष्टी सौंदर्याने नटलेला शिवथर घळीतील वास्तव्यात त्यांनी 'दासबोध ' रचला.

**पसरले सरले गिरी साजरे|**
**सरवटे धुकटे भरीते भरे||**
**बहु वात झडाच झडाडीतो**
**वर तरु वरताची कडाडितो |**

असं पावसाळ्यातील निसर्गाचा सुरेख वर्णन केले आहे.
बागेत कोणकोणती झाडे लावावीत हे समर्थांनी बाग प्रकरणात सांगितले आहे.

**प्रसंग निघाला स्वभावे | बागेमध्ये काय लावावे |**
**म्हणूनही घेतली नावे | काही एक ||**

अशी सुरुवातच जवळपास तीनशे वृक्षांची नावे समर्थांनी सहजपणे घेतले आहेत. महावृक्ष, फळझाडे,लता वेली,कंदमुळे,फुलझाडे, जंगलातील झाडांची नावे देखील त्यात आहेत. संत साहित्यात आलेले वृक्षलता बरोबरच पक्षांचे संदर्भही एका अनोख्या निसर्ग संवेदनाचा आविष्कार करतात. हे पशुपक्षी पर्यावरणाचे दूत असतात. कोकीळ, पिंगळा चातक ,कावळा ,पावश्या, मोर या पक्षांचे उल्लेखही संत साहित्यात आढळून येतात. संत एकनाथांनी पोपट, पाखरू, वटवाघुळ, टिटवी इत्यादी पक्षी तर विंचू ,एडका कुत्रे ही पशुविषयक रूपके वापरली आहेत. संत ज्ञानेश्वरांसाठी कावळा हा पाहुणे येणार हे शुभ शकुन सांगणारा पक्षी आहे. पिंगळा हा पक्षी निसर्गातील घडामोडीचे जाणीव करून देणारा पक्षी आहे. पिंगळ्याचे सांकेतिक संकेत घेऊन पिंगळा नावाचा बहुरूपी लोकजीवनात पहाटे येऊन निसर्गातील घडामोडीचे भविष्यवजा सूचन करीत असे. संत एकनाथांनी पिंगळ्यावरील रुपकात म्हणतात,

**पिंगळा महाद्वारी |बोली बोलतो देखा||**
**शकुन सांगतो तुम्हा| हा एक ऐका||**

संत नामदेवानीही आपल्या अभंगात पिंगळ्याचे रूपक वापरले आहे. संत एकनाथांनी परोपकारची वृत्ती विशद करताना म्हटले आहे.

**त्या पर्वता ऐशी तत्वता**
**टसावी साधकाची उदारता**
**काया वाचा आणि चित्ता**
**सर्वस्व देता उल्हासु**
**परमार्थाचीया चाडा**
**स्वार्थ सांडोनी रोकडा**

पर्वत हे परोपकार वृत्तीचे प्रतीक आहेत .तर निसर्गातील पशुपक्ष्यांचा मायेचा दाखला संत जनाबाईंनी आपल्या अभंगातून विठ्ठलाशी जोडला आहे .

**पक्षी जाय दिगंतरा |बाळकाशी आणि चारा ||**
**घार हिंडते आकाशी |झाप झाली पिल्लापासी ||**
**वानर हिंडे झाडावरी| पिल्ली बांधणी उदरी ||**
**तैसे आम्हासी विठ्ठल माये |जनी वेळावेळा पाहे ||**

संत आणि देव हे एकच आहेत हे पटवून देण्यासाठी
संत जनाबाईने पाणी आणि मेघ याचे उदाहरण दिले आहे.

**पाणी तेचि मेघ मेघ तेंचि पाणी ||**
**काय या दोन्हीपणी वेगळीक ||**

संत मुक्ताबाई वयाने लहान पण योग्यतेने श्रेष्ठ आणि ज्येष्ठ होत्या. त्यांचे ताटीचे अभंग मानवी जीवनाचे महान तत्त्वज्ञान सांगणार आहेत .इतर अभंगातही त्या निसर्गाचे दृष्टांत देतात. मुंगी उडाली आकाशी तिने गिळीले सूर्याशी अभंगात गुढरम्य असून निसर्गाचे दर्शन घडते.

संत कान्होपात्रा यांनी लिहिलेल्या अभंग "नको देवराया" यात असलेला भक्तिमय दृष्टांत 'हरिणाचे पाडस वेगळे घरी येणे मजलागी झाले तैसे देवा' त्यात निसर्गाशी जवळीकता दिसून येते.संत सावता माळी यांनी तर

**कांदा मुळा भाजी | अवघी विठाबाई माझी ||**

**लसन मिरची कोथिंबिरी | अवघा झाला माझा हरी ||**

असे सांगत निसर्गातील घटकाशी दैवत्व बहाल करून त्यांच्याशी एकरूप झाले आहेत. शेतातल्या पिकातून ,धन धान्यातून विठ्ठल शोधणाऱ्याला निसर्ग परमेश्वराची अनुभूती देतो.

संत चोखामेळा आपला भाव व्यक्त करताना म्हणतात,

**नदी डोंगी परी जळ नव्हे डोंगे ||**

**काय भूललासी वरलीया रंगे ||**

त्यावरून संतांच्या निसर्ग ज्ञानाचा आवाका केवढा मोठा होता तेही जाणवते.

बाराव्या शतकात लिहिण्यात आलेल्या 'लीळाचरित्र' ग्रंथात झाड ,पशु,पक्षी यांच्यात समन्वय कसा राखावा? त्यांचे जतन करावे याचे यथोचित वर्णनआले आहे.श्री चक्रधर स्वामींनी सारंग पंडितांच्या मुलीला म्हणजे धानाईसाला कावळ्याची आणि साळेची कथा रंगवून सांगितल्याची लीळा 'लीळाचरित्रा'त पूर्वार्ध मध्ये सापडते.निसर्ग सौंदर्याने नटलेले पर्वत डोंगर ,ईश्वरचिंतन नामस्मरण करण्यासाठी एकांत असणाऱ्या गुहा आहेत. खळखळणारे झरे आहेत. घनदाट वृक्षाने नटलेली वनराई आहे. या वनराईचे वृक्षांचे अथांग पाण्यात पडलेले प्रतिबिंब रात्रीच्या चांदण्यात या सगळ्यांचे अथांग डोहात पडणारे प्रतिबिंब, चंद्राची किरणे पडून चांदीप्रमाणे चमकणारे पाणी अनुपम सौंदर्य तुम्हाला कुठून कळणार? हे सुख तुमच्या नशिबी कुठले असणार हे त्यांनाच कळणार ज्यांच्या हृदयात परमेश्वर आहे. असेच सर्वज्ञ चक्रधराने एका लीळेत सांगितले आहे.

अमूर्त अशा परमात्म्याचं मूर्त रूप म्हणजे निसर्ग. निसर्ग हा गुरु आणि महान दाता असून पर्यावरण हेच परमात्म्याचे अंगण तर सर्व घटक या विश्वाचे चैतन्य होय.

मराठी संत साहित्यातून दिसून येणारे पर्यावरण हे नैतिक व तात्विक स्वरूपाचे आहे. संत साहित्यातून आलेले पर्यावरण हे परमार्थच्या विचारातून व्यक्त झाल्याने ते प्रापंचिक जीवाला उपदेश करण्यासाठी आल्याने ते सांकेतिक व संकल्पनात्मक राहिले. असे असले तरीही संतांचा पर्यावरणीय विषयक दृष्टिकोन हा जीवसृष्टी व भूतसृष्टी या दोन्हीच्याही कल्याणाचा होता. संत साहित्यात पर्यावरणीय संवर्धनाची व संरक्षणाची बीजे आढळून येतात. यातून पर्यावरण विषयक नीतीबोध प्राप्त होतो.

संदर्भ ग्रंथ

1) सार्थ श्रीज्ञानेश्वरी -वै. ह. भ .प. मामासाहेब दांडेकर
२) सार्थ श्री तुकाराम गाथा -वै. ह. भ. प. मामासाहेब दांडेकर
३) श्री सार्थ दासबोध-संपादक ल.रा.पांगरकर
४) सकल संत गाथा भाग १व २-संपा. श्री का. अ.जोशी